# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 03.07.2025** **वार- गुरुवार**

---

**<u>अमितशहा</u>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आजपासून दोन दिवसांच्या पुणे दौऱ्यावर येत आहेत. आज रात्री त्यांचं पुण्यात आगमन होईल. त्यानंतर उद्या त्यांच्या उपस्थितीत विविध कार्यक्रम होणार आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्याचं साम्राज्यात रुपांतर करणारे अजेय योद्धा थोरले बाजीराव पेशवे यांचा अश्वारूढ पुतळा खडकवासला इथल्या राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या परिसरातील त्रिशक्ती प्रवेशद्वारावर उभारण्यात आला आहे. या पुतळ्याचं अनावरण अमित शहा यांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर शहा राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीतील छात्र आणि सैन्य अधिकाऱ्यांशी संवाद साधणार आहेत. पुण्यातील कोंढवा परिसरातील जयराज क्रीडा संकुलाचं उद्घाटन तसंच बाळासाहेब देवरस रुग्णालयाची पाहणी अमित शहा करणार आहेत. वडाची वाडी रस्त्यावर उभारण्यात येणाऱ्या पीएचआरसी हेल्थ सीटीचं भूमिपूजनही अमित शहा यांच्या हस्ते होणार आहे.

**<u>दुर्गविश्वास</u>**

नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्तींमध्ये तत्पर प्रतिसाद देण्याच्या अनुषंगानं आपत्ती प्रतिसाद आणि व्यवस्थापनाच्या क्षेत्रात तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणालीचा वापर महत्त्वपूर्ण ठरू शकतो, असं प्रतिपादन माजी लष्कर प्रमुख जनरल मनोज पांडे यांनी आज पुण्यात केलं. लष्करी अभियांत्रिकी महाविद्यालयाने आयोजित केलेल्या दुर्गविश्वास या परिषदेत ते बोलत होते. आपत्ती व्यवस्थापन विषयावरील या परिषदेला लष्कराच्या दक्षिण विभागाचे प्रमुख लेफ्टनंट जनरल धीरज शेठ, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे महासंचालक पीयूष आनंद, लेफ्टनंट जनरल अरविंद वालिया, राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे

सदस्य निवृत्त लेफ्टनंट जनरल सईद आता हसनैन, प्राधिकरणाचे प्रमुख राजेंद्र सिंह आदि उपस्थित होते.

कोणत्याही नैसर्गिक किंवा मानवनिर्मित आपत्तीच्या काळात काम करण्यासाठी लष्कर आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांच्यात समन्वय असणं आवश्यक आहे, असं धीरज शेठ म्हणाले. या अनुषंगानं महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी आपत्ती प्रतिसाद आणि व्यवस्थापन या संदर्भात चर्चा झाली असून अन्य ११ राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी याबाबत चर्चा सुरू असल्याचं शेठ म्हणाले.

**<u>एनडीआरएफ</u>**

पावसाळ्यात पूर येण्याची शक्यता असलेल्या ९७ ठिकाणी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या तुकड्या तैनात करण्यात आल्या असल्याची माहिती राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे महासंचालक पीयूष आनंद यांनी आज पुण्यात दिली. या संदर्भात पत्रकारांशी संवाद साधताना ते म्हणाले की, आपत्ती व्यवस्थापनाच्या कामात अत्याधुनिक उपकरणांचा उपयोग करण्याचा NDRF चा प्रयत्न आहे.

**<u>स्मार्टटीओडीमीटर</u>**

राज्यात वीज वितरण प्रणालीच्या आधुनिकीकरणाच्या दिशेने एक महत्त्वाचं पाऊल उचलण्यात आलं आहे. महावितरणने आतापर्यंत वीजवाहिन्या, रोहित्र, शासकीय कार्यालये आणि ग्राहकांकडे मिळून 35 लाख स्मार्ट ‘टाईम ऑफ डे’ म्हणजे टीओडी मीटर बसवून ते कार्यान्वित केले आहेत. राज्यातील तीन कोटींहून अधिक वीज ग्राहकांना टप्प्याटप्प्याने हे मीटर बसवून देण्यात येईल. आजवर केवळ औद्योगिक ग्राहकांसाठी मर्यादित असलेली ‘टाईम ऑफ डे’ वीजदर सवलत आता घरगुती ग्राहकांनाही लागू होणार आहे. ज्या ग्राहकांकडे स्मार्ट मीटर बसवण्यात आले आहेत, त्यांना दिवसा, म्हणजेच सकाळी 9 ते संध्याकाळी 5 या वेळेत वापरलेल्या विजेवर प्रति युनिट 80 पैसे सवलत मिळणार आहे. डिजिटल तंत्रज्ञानावर आधारित हे स्मार्ट मीटर महावितरण आणि ग्राहक या दोघांसाठीही फायदेशीर ठरणार असल्याचं महावितरणनं म्हंटलं आहे.

**<u>पुणेआरोग्यविभाग</u>**

गेल्या काही दिवसांपासून धरणक्षेत्र आणि डोंगरमाथा परिसरात पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे पाण्याबरोबरच माती, गाळ धरणात येत आहे. परिणामी धरणाचं पाणी गढूळ झालं असून त्याबाबत नागरिकांकडून तक्रारीही येत आहेत. धरणातील पाण्यावर प्रक्रिया करून ते शुद्ध केलं जातं मात्र, सध्या पाण्यातील गढूळपणाची पातळी अधिक आहे; त्यामुळे नागरिकांनीही पाणी उकळून आणि गाळून प्यावं, असं आवाहन पुणे महापालिकेच्या आरोग्य प्रशासनानं केलं आहे.

**<u>योगासन</u>**

हरितास चॅरिटेबल ट्रस्ट आणि माइंड अँड बॉडी योगा इंस्टीट्यूट यांनी संयुक्तपणे पुण्यात योगासनांची स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत बालवर्गापासून ते बारावीपर्यंतच्या तीनशेहून अधिक मुला मुलींनी भाग घेतला. स्पर्धेचं बक्षीस वितरण मेजर मैत्रेयी दांडेकर आणि क्रीडा समीक्षक डॉक्टर मिलिंद ढमढेरे यांच्या हस्ते झालं.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज दिवसभर ढगाळ हवामान होतं; कमाल तापमान 28 तर किमान तापमान 21 पूर्णांक 9 दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्याही शहर परिसरात आकाश ढगाळ राहून हलका पाऊस पडेल तर घाट परिसरात तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**